

सर्व भाविकांना गजानन महाराजांच्या प्रकटदिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

REGD. NO. MAHMAR/2009/50825

अन्यायाचा अंत..!

साप्ताहिक दिव्यशक्ती

पोस्टल परवाना- JAL /293 / 2016-18,

संपादकः मुकेश जोशी
मो. 9421002607

वर्ष ११ | विशेष | सोमवार दि. २५/०२/२०१९ | पाने ४ | किंमत रु. २/-

# स्मरण जलदूताच्या जलसंवादाचे...

**जैन इरिगेशनचे संस्थापक अध्यक्ष भवरलालजी जैन यांचा आज तृतीय श्रद्धावंदनदिन. एका थेंबानं त्यांच्याशी केलेला हा जलसंवाद...**

प्रिय भाऊ,

मी पाण्याचा एक थेंब तुमचे स्मरण करतोय तुमच्या तिसऱ्या स्मृतिदिनानिमित्त...

तीन वर्षापूर्वी तुम्ही जगाचा निरोप घेतला. तुमचे स्मरण करण्याचे केवळ एवढेच निमित्त नाही. स्मरण करण्याची असंख्य कारणं आहेत. आमच्या, म्हणजेच पाण्याच्या अस्तित्वासोबतच तुम्ही स्वतःला जोडून घेतले. बहुधा ईश्वरानेच तुम्हाला जलदूत म्हणून पृथ्वीवर धाडले असावे! ज्या देशात महापूर आणि दाहक दुष्काळही येतात, अशा देशात तुम्ही प्रत्येक थेंबाची किंमत जाणली. तंत्रज्ञानाच्या साहाय्याने ते मूल्य अधिक वाढवले. *'थेंब थेंब पाणी, जीवनात चैतन्य आणी'* ह्या मूलमंत्राने तुमचे जीवन व्यापून गेले. आम्हा थेंबांना तुम्ही मौल्यवान बनविले. 'मोअर क्रॉप, पर ड्रॉप' अशी शिकवण तुम्ही इथल्या शेतकऱ्यांना दिली; त्यांनीही ती स्वीकारली. मग फुलले समृद्धीचे मळे!

स्मरण एका थेंबाकडून

तुम्ही आयुष्यभर संवादावर सतत भर दिला. व्यवसाय... कुटुंब... शेतकरी... समाजकारण... नवी पिढी... अशा तुमचे आयुष्य व्यापून टाकणाऱ्या सगळ्या क्षेत्रांत तुम्ही मुक्त संवाद करीत राहिलात. संवादाचे महत्त्व सगळ्यांना पटवून दिले. संवादामुळेच जगभरातील बहुसंख्य देशांत तुम्ही अनेक उद्योगांना संजीवनी दिली. तिथल्याही शेतकऱ्यांच्या शेतात हास्य पिकवले. *'पाणी निम्म्याने, उत्पादन दुपटीने, करामत करा जैन ठिबकने!'* हे समस्त शेतकऱ्यांनी जाणले. म्हणूनच आज जैन इरिगेशनचा झेंडा जगभरातल्या कोट्यवधी शेतांमध्ये डौलाने फडकत असतो.

संवाद केवळ तुम्ही माणसांपुरता मर्यादित ठेवला नाही. झाडा-झुडूपांशी, पिकांशी, फळा-फुलांशी, पशू-पक्ष्यांशी संवाद साधला तर आर्थिक सुबत्ता फार दूर नाही, असं तुम्ही सतत अधोरेखित करत होतात. नंतर तर तुम्ही पाण्याशी बोलू लागलात. अगदी माझ्यासारख्या हरेक छोट्या थेंबाशीही! तो होता जलसंवाद!! थेंबाबरोबर जलसंवाद म्हणजे त्या थेंबाला काटेकोरपणे काम करायला लावणे. भाऊ, किती सहज आणि सोप्या रीतीनं तुम्ही इथल्या शेतकऱ्याला तंत्रज्ञानाकडे वळविले! मुबलकता असली की आमचा वापर कसाही होऊन त्याची नासाडी ठरलेलीच असायची. गरज नसताना आम्हाला शेतांतून मोकाट हिंडण्याची खोड लागली. ही खोड तुम्ही मोडली! अर्थात, आमचे काही बांधव नाइलाजाने ही खोड सोडू शकलेले नाहीत. आम्ही मुक्त वहायला लागलो की तुम्ही तुम्ही म्हणत,


*"अरे यांना अडवा, जिरवा, मुरू द्या. थेंबाथेंबाने त्याला पिकांच्या मुळाशी गरजेपुरते जाऊ द्या!* त्यांच्यावर नियंत्रण ठेवा म्हणजे प्रत्येक थेंब शिस्तीत त्याचे काम करेल. त्याच्यावर लक्ष ठेवा. प्रत्येक थेंबाशी बोला. म्हणजे तोही पिकाशी बोलू लागेल. संवाद सुरू झाला की त्याचं काम परिणामकारकपणे करता येईल. पिकाचे म्हणजेच प्रत्येक झाडाचे अन् थेंबाचे मैत्र वाढले तर तुमची संपत्ती आपोआप वाढेल!

भाऊ, तुमचा जलसंवादाचा हा मंत्र फक्त शेतकऱ्यांसाठी नव्हता. तुम्ही एकाचवेळी परंपरा, मूल्य, तंत्रज्ञान आणि उद्याचे भान यामोवती स्वतःला बांधून घेतले होते. संवादाचे बोट मात्र सोडलेले नव्हते. रानावनात सुरू झालेल्या या संवाद-जलसंवादाची व्याप्ती तुम्ही शास्त्रज्ञांसोबत वेगळ्या पातळीवर नेली. *'माझा शेतकरी पहिल्यांदा, त्याची गरज पहिल्यांदा. त्याला झेपेल, परवडेल आणि आवडेल अशा चौकटीत तुम्ही तंत्रज्ञान आणा'*, असे आग्रहाने त्यांना सांगत असत. मग थेंबासोबत खतं देण्याचे तंत्रज्ञान अवतरले. शास्त्रीय भाषेतले फर्टिगेशन ते हेच! मग भाऊ तुमचे काम सुरू व्हायचे... तंत्रज्ञान आणि शेतकऱ्यांना जोडण्याच्या संवादाचे. जणू एका जलयोगी पुरुषाच्या जलसंवादाचे! तुमचा आग्रह असायचा, *'प्रत्येक थेंबाला पुरेपूर काम द्या. या थेंबांना खते वाहून नेण्याचेही काम द्या'* तुमच्या या संवाद शैलीमुळे शेतकरी तंत्रज्ञान स्वीकारायला लागले. पिकाच्या मुळापर्यंत जाण्याची आमची 'वाहतूक व्यवस्था' सुरू झाली. खतांची नासाडी थांबली. खतं हवेत उडून जाणे कमी झालं. पानांमध्येच अडकून पडणे थांबलं. अंतिम परिणाम काय..? खर्चात बचत! संवादामुळे तंत्रज्ञान तुम्ही शेतात रुजवलं. असंख्य शेतकऱ्यांनी तुम्हाला हृदयात स्थान दिलं!

भाऊ, आयुष्याच्या अखेरपर्यंत प्रत्येक थेंबाची तुम्ही काळजी घेत राहिलात. काळजीमागे शेतकऱ्याचे हित, हाच तुमचा ध्यास होता. आमच्यासारख्या थेंबालाही तुम्ही प्रतिष्ठा दिली... मूल्य दिले... किंमत वाढवली. ज्याला जमेल ते काम स्पष्ट सूचनेसह देणे व परिणामकारकपणे ते करायला लावणे, ह्या तुमच्या स्वभावानुसार आम्हालाही काम दिले. आणि स्पष्टपणे बजावले की तुमचे काम, 'मोअर क्रॉप, पर ड्रॉप' हेच आहे. स्रोतापासून पिकांच्या मुळापर्यंत पोहोचताना तुमचा हाच मंत्र परिणामकारक पद्धतीने जपणे, हीच तुम्हाला खरी आदरांजली. तुमच्या जलसंवादाचे अस्तित्व तुम्ही अजरामर करून ठेवले आहे. आम्हा थेंबाथेंबांचे अस्तित्व हेच आमचे आणि तुमचेही अस्तित्व आहे. ते कोण विसरणार?

कळावे,

एक थेंब



> पाणी हे जीवनाचे मूळ आहे, आधार आहे. जीवनाला विशिष्ट आकार देण्यासाठी सर्वोच्च साधनही आहे. नव्हे; पाणी म्हणजे मनुष्यजातीची जननी आहे.
>
> – भवरलाल जैन

